नियमीत दिवाणी दावा क्रमांक ९४/२०१२ मधील नि.क्र.२५ खाली आदेश
(दिनांक ०४/०७/२०१५)

प्रतिवादी क्रमांक १ याने सदर अर्ज हा प्रस्तुत दावा दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १० नुसार स्थगीत करण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्ज तसेच त्यावरील वादी क्रमांक १ ते ५ यांनी नि.क्र.२६ नुसार दाखल केलेले त्यांचे म्हणने वाचले. अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ तर्फे श्री. मालपे वकील व वादीं तर्फे श्री.वानखडे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ याचे कथन असे आहे की वादींनी प्रस्तुत दावा वाटणी व वेगळा हिस्साकरीता दाखल केला आहे. त्यातील वाद मिळकत हि मौजा वरुड येथील गट क्रमांक १९७/२ क्षेत्रफळ ० हे ८१ आर एवढे आहे. परंतु सदर वाद मिळकती विषयी यापुर्वीच प्रतिवादी क्रमांक १ ने प्रतिवादी क्रमांक २ प्रकाश यांच्या विरुध्द नियमीत दिवाणी दावा क्रमांक ८४/९७ दाखल केला होता व तो दावा घोषणेसह कायम मनाई हुकुमाकरीता दाखल केला होता. त्या दाव्याचा निकाल दिनांक ०२/०१/२००९ रोजी अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ च्या बाजुने लागला. त्या निकालाच्या विरुध्द प्रतिवादी क्रमांक २ प्रकाश याने आदरणीय जिल्हा न्यायालय, अमरावती येथे नियमीत दिवाणी अपील क्रमांक ३६/२००९ दाखल केले. त्या अपीलाचा निकाला दिनांक ०३/०३/२०१४ रोजी अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ च्या विरोधात लागला. त्यानंतर अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ याने आदरणीय जिल्हा न्यायालय अपीलाच्या विरोधात आदरणीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ येथे दुसरे अपील दाखल केले व ते सद्या प्रलंबीत आहे. अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ चे कथन असे आहे की प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकत व आदरणीय उच्च न्यायालयातील अपील क्रमांक १९५/१४ मधील मिळकत एकच आहे. त्यामुळे सदर वाद मिळकत व तिचा मालकीचा प्रश्न

हा न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे अर्जदार प्रतिवादी कमांक १ ने अशी विनंती केली की सदर दाव्यात गुंतागुत होवु नये म्हणुन दिवाणी प्रकिया संहितेचे कलम १० नुसार स्थगीत करण्यात यावा.

३. वादी कमांक १ ते ७ यांनी त्यांच्या नि.क.२६ नुसार जबाबामध्ये ते दावा मिळकतीचे कायदेशिर वारस असल्याचे नमुद केले. तसेच दावा मिळकत त्यांचा हिस्सा असल्याचे सांगितले. त्यांचे कथन असे आहे की पुर्वी दाखल केलेल्या नियमीत दावा कमांक ८४/१९९७ मध्ये त्यांना पक्षकार म्हणुन समाविष्ठ करण्यात आले नव्हते. त्यामुळे त्यातील हुकुमनामा हा त्यांच्यावर बंधनकारक नाही. तसेच तो दावा घोषणा व मनाई हुकूमाकरीता होता. त्यामुळे दिवाणी प्रकिया संहितेचे कलम १० मधील तरतुदी प्रस्तुत दाव्यास लागु होत नाही. त्यामुळे सदर अर्ज खर्चासह फेटाळुन लावण्याची विनंती त्यांनी केली.

४. प्रस्तुत प्रकरणातील दावा मिळकत हि मौजा वरुड येथील शेत कमांक १९७/२ ० हे ८१ आर एवढे आहे. सदर मिळकत हि गंगुबाई राजेराम खासबागे यांनी स्वकष्टार्जीत कमाईतुन दिनांक ०४/०४/१९६८ रोजी खरेदीखताने विकत घेतली आहे. सदर गंगुबाई हि दिनांक २०/०८/१९९७ रोजी मरण पावली आहे. तिला सुरेश (प्र.क.१), प्रकाश (प्र.क.२), भाउराव (मयत) हे तिन मुले व ललीता (प्र.क.३) तसेच मयत चंद्रकला (वा.क.१ ची पत्नी व वा.क.२ ते ४ ची आई) या दोन मुली असे वारस होते. अर्जदार प्रतिवादी कमांक १ याने दिवाणी दावा कमांक ८४/१९९७ दाखल केला होता त्यामध्ये त्याने वाटणीपत्रा आधारे तो व त्याचा भाउ भाउराव हे मालक असल्याचे घोषीत करुन मागितले होते. याउलट, प्रतिवादी कमांक २ प्रकाश याच्या कथनानुसार तो वाद जमीनीचा मृत्युपत्राच्या आधारे मालक

असल्याबाबत नमुद केले होते. प्रतिवादी कमांक २ याच्या कथनानुसार मयत गंगुबाई हिने सदर मिळकत हि मृत्युपत्रानुसार प्रतिवादी कमांक १ व त्यास अर्धी अर्धी वाटुन दिली होती.

७. प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार प्रतिवादी कमांक १ हा वाटणीपत्राच्या आधारे दावा मिळकतीचा मालक असल्याचे सांगतो. याउलट, प्रतिवादी कमांक २ हा मृत्युपत्राच्या आधारे दावा मिळकतीचा मालक असल्याचे सांगतो. पुर्वीच दाखल केलेला दावा कमांक ८४/९७ मध्ये प्रस्तुत वादींना पक्ष म्हणुन समाविष्ठ करण्यात आले नव्हते. दिवाणी अपील कमांक ३६/२००९ मधील निकालपत्रातील परिच्छेद कमांक २४ पाहिले असता सदर मिळकत हि गंगुबाई हिच्या मृत्युनंतर एकत्रीत कुटुंबाची मालमत्ता असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे मयत गंगुबाई हिचे वादी व प्रतिवादी हे सर्व वारस ठरतात.

६. दिवाणी प्रकिया संहितेचे कलम १० मध्ये एखादया प्रकरणातील कायदेशिर मुदद्‌ा हा पुर्वीच्या दाव्यात तसाच असणे आवश्यक आहे तसेच त्यातील पक्ष व टायटल देखील सारखेच असले पाहिजे. परंतु प्रस्तुत दावा कमांक ९४/२०१२ हा दावा मिळकतीची वाटणी व वेगळा ताबा मिळण्याकरीता केला आहे. या प्रकरणातील वादींना पुर्वीचा दिवाणी दावा कमांक ८४/१९९७ मध्ये पक्ष म्हणुन समाविष्ठ करण्यात आले नव्हते. तसेच पुर्वीचा दावा हा घोषणेसह मनाई हुकुमाकरीता दाखल करण्यात आला होता. पुर्वीच्या दाव्यात जरी आदरणीय उच्च न्यायालयात अपील झाले असले व त्यातील निकाल जरी लागला तरी त्यात वादीच्या हक्कास बाधा निर्माण होवु शकतो कारण वादींना त्या दाव्यामध्ये पक्ष म्हणुन समाविष्ठ करण्यात आले नाही.

७. वर नमुद विश्लेषनावरुन प्रतिवादी कमांक १ याने दिवाणी प्रकिया संहितेचे कलम १० नुसार दाखल केलेला अर्ज हा त्या कलम १० मधील घटकानुसार कक्षेत येत नाही. परिणामी, सदर अर्ज फेटाळुन लावणे योग्य वाटते. सबब, आदेश :-

1. अर्ज खर्चासह फेटाळण्यात येतो.
2. प्रतिवादी कमांक १ यास आदेशित करण्यात येते की त्याने वादीच्या साक्षीदाराची उलट तपासणी घ्यावी.

( एन.के.जोशी )
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरुड.

दिनांक : ०४/०७/२०१५